# पुणे विद्यापीठ
सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ
**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**
एम.एस.सी., पी.एच.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र.: विकमं/२०१२–१३/७९३ दिनांक : २०/०२/२०१३.

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली **पुणे जिल्हयांतील**
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

**विषय:– पुणे जिल्हास्तरीय विद्यार्थिनी पदभ्रमण शिबिराबाबत.....**

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे, चांदमल ताराचंद बोरा कला, वाणिज्य (व्यवस्थापन), विज्ञान महाविद्यालय, शिरूर, जि. पुणे – ४१२ २१० यांचे संयुक्त **विद्यमाने गुरुवार, २८ फेब्रुवारी ते ०२ मार्च, २०१३ या कालावधीत** पुणे जिल्हास्तरीय विद्यार्थिनी पदभ्रमण शिबिराचे 'भिमाशंकर' येथे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागांतील दोन विद्यार्थिनींना यांना शिबिरासाठी **गुरुवार, दि. २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी दुपारी ०२.३० वाजेपर्यंत भिमाशंकर एस.टी. स्टॅन्डवर येथे** उपस्थित राहणेबाबत सूचित करावे व सदर पत्र आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/ पदव्युत्तर विभागांतील सूचना फलकांवर प्रदर्शित करावे, ही विनंती.

कळावे,

**सोबत : महाविद्यालयाचे पत्र.**

२०/२/२०१३

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ


**विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेश खिंड, पुणे – ४११ ००७.**
**☎ ०२० – २५६०११५४ फॅक्स : ०२० – २५६०११५४ मोबाईल : ९८५०१७६५७५**

S. S. P. Mandal's

# Chandmal Tarachand Bora College

Arts ■ Commerce ■ Science ■ Management

NAAC B++

(Affiliated to University of Pune : ID. No. PU / PN / ASC / 019 / [1968] )

Shirur (Ghodnadi) 412210 (Pune)

N. S. NIKAM
Principal

Tel: (02138) - 222301, 224170, 224688
(Resi.) (222214)
Fax: (02138) 224170
E.Mail : ctborainfo@rediffmail.com

Ref. No. १३५७/वि.कल्याण/१२-१३ Date : 15 FEB 2013

विद्यार्थी कल्याण मंडळ
आवक/जावक क्र.:- 2743
दिनांक :- 20/2/2013
शाखा :- उ.श.

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक

विषय - जिल्ह्यस्तरीय विद्यार्थिनी पदभ्रमण शिबिराबाबत....

महोदय,

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय शिरुर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. २८ फेब्रुवारी २०१३ ते शनिवार दि.२ मार्च २०१३ या कालावधीत पुणे जिल्हयास्तरीय विद्यार्थिनी पदभ्रमण शिबीर **भीमाशंकर** येथे आयोजित करण्यात आले आहे.

सदर तीन दिवसीय पदभ्रमण शिबीरासाठी आपल्या महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींना भीमाशंकर येथे गुरुवार दि.२८ फेब्रुवारी २०१३ रोजी दु.२.३० पर्यत अवश्य पाठवावे.शिबीराचा स्वागतकक्ष भीमाशंकर एस.टी.स्टॅन्डवर स.१० ते दु.४.०० पर्यत असेल.

सहभागी प्रतिनिधींचा प्रवास खर्च महाविद्यालयाने करावयाचा असून भोजन व निवासाची व्यवस्था आयोजक महाविद्यालयातर्फे करण्यात आलेली आहे.

सहभागी होणा-या विद्यार्थिनींची नावे ई.मेल व्दारे (ctborainfo68@gmail.com,) (jadhavharidas@gmail.com) **दि.२५ फेब्रुवारी २०१३** पर्यत पाठविणे आवश्यक आहे. या दिनांकानंतर आलेल्या नावांचा शिबीरासाठी विचार केला जाणार नाही. ऐनवेळी कोणालाही शिबीरात सहभागी करुन घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपले विश्वासू,

प्रा.हरिदास जाधव
विद्यार्थी कल्याण अधिकारी

न.श्री.निकम
प्राचार्य

टीप- शिबीरात सहभागी होणा-या विद्यार्थिनींनी पदभ्रमणासाठी आवश्यक बूट, शक्य असल्यास ट्रॅक सूट, सॅक, आवश्यक औषधे, पाण्याची बाटली, अंथरुण-पांघरुण इ.वस्तू सोबत आणाव्यात.

संपर्कासाठी दूरध्वनी - प्रा. हरिदास जाधव ९७६७१०१८२२, प्रा.रत्नप्रभा जाधव ८६०५०००८४०
प्रा. क्रांती पैठणकर - ९८५०८६६५३९